# कृषि पणन विषयक बातम्या : जुलै 2022

पुढारी

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत बाजार समित्यांचे रँकिंग

## कृषी बाजार व्यवस्थेतील पहिलाच प्रयत्न | पणन संचालक सुनील पवार यांची माहिती



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाअंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी (रँकिंग) पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात येणार आहे. राज्यामध्ये प्रथमच अशा प्रकारे कार्यरत असलेल्या ३०७ बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यामध्ये स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाअंतर्गत पणन संचालनालय स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कार्यरत आहे. स्मार्ट प्रकल्पाच्याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे' हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. राज्याच्या कृषी बाजार व्यवस्थेतील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

३१ जुलै २०२२ अखेर राज्यभरातील बाजार समित्यांची निकषनिहाय माहिती व गुण याची माहिती प्राप्त होणार आहे. त्यानंतर लवकरच पणन संचालनालयाकडून बाजार समित्यांची २०२१-२२ या वर्षाची वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध केली जाणार आहे. या निकषांबाबत बाजार समित्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीची तालुका उपनिबंधक किंवा सहायक निबंधक बाजार समितीस प्रत्यक्ष भेट देऊन व तपासणी करून गुण देणार आहेत.

पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधा, आर्थिक कामकाज निकषात बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न, बाजार फी, वाढावा, शेतमाल आवक, वैधानिक कामकाजात समितीचे मागील ५ वर्षांतील लेखापरीक्षण, सचिव नियुक्तीस मान्यता, संचालक मंडळाविरुद्ध झालेली बरखास्तीची कारवाई, खरेदीदारांच्या दप्तराची तपासणी, अडत्यांच्या वजनमापाची तपासणी आदी प्रमुख निकष आहेत. क्रमवारीमुळे शेतकरी नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान समजले जाणार असून, समित्यांमध्येही निकोप स्पर्धावाढीस फायदा होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### गुणांची क्रमवारी अशी निश्चित होणार...

२०२१-२२ या वर्षाच्या कामगिरीनुसार क्रमवारी ठरविण्यासाठी ३५ निकष व २०० गुण ठरवण्यात आले आहेत. त्यामध्ये पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधाअंतर्गत १४ निकष असून, त्यासाठी एकूण ८० गुण, आर्थिक कामकाजाबाबत ७ निकष- ३५ गुण, वैधानिक कामकाजाबाबत ११ निकष- ५५ गुण तर योजना उपक्रमातील सहभाग व इतर विषयी ३ निकष असून, त्यासाठी ३० गुण असे एकूण २०० गुणांवर आधारीत ही क्रमवारी असेल. म्हणजेच निकषांच्या आधारे प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे राज्यातील बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित केली जाणार आहे.

My Gramin Edition
Jul 25, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांची माहिती

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यातील बाजार समित्यांचे रँकिंग

पुणे : प्रतिनिधी

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यभरातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी (रँकिंग) पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात येणार आहे. राज्यामध्ये प्रथमच अशा प्रकारे बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर होणार आहे, अशी माहिती राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यामध्ये स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत पणन संचालनालय स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कार्यरत आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

राज्याच्या कृषी बाजार व्यवस्थेतील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर झाल्यांनतर राज्यातील इतर बाजार समित्यांच्या तुलनेत आपण शेतमाल नेत असलेल्या बाजार समितीचे स्थान शेतकऱ्यांना समजण्यास मदत होणार आहे. तसेच बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा निर्माण होण्यास मदत होणार आहे.

## पायाभूत व इतर सुविधेसाठी निकष

बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधेनुसार निकष तयार करण्यात आलेले आहेत. २०२१-२२ या वर्षाच्या कामगिरीनुसार क्रमवारी ठरविण्यासाठी ३५ निकष व २०० गुण ठरवण्यात आले आहेत. त्यामध्ये पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधाअंतर्गत १४ निकष असून त्यासाठी एकूण ८० गुण, आर्थिक कामकाजाबाबत ७ निकष - ३५ गुण, वैधानिक कामकाजाबाबत ११ निकष - ५५ गुण तर योजना उपक्रमातील सहभाग व इतरविषयी ३ निकष असून त्यासाठी ३० गुण अशी एकूण २०० गुणांवर आधारित ही क्रमवारी असेल.

## शेतकऱ्यांच्या योजनांची तपासणी

आर्थिक कामकाज निकषात बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न, बाजार फी, वाढावा आणि शेतमालाची आवक यामध्ये झालेली वाढ, बाजार समितीचा आस्थापना खर्च तसेच नियमित भाडेवसुली आदी, वैधानिक कामकाज निकषात बाजार समितीचे मागील पाच वर्षांतील लेखापरीक्षण, लेखापरीक्षणाची दोषदुरुस्ती, सचिव नियुक्तीस मान्यता, संचालक मंडळाविरुद्ध झालेली बरखास्तीची कारवाई, खरेदीदारांच्या दप्तराची तपासणी, अडत्यांच्या वजनमापाची तपासणी आदी प्रमुख निकष आहेत. तसेच बाजार समिती शेतकऱ्यांसाठी कोणकोणत्या योजना, उपक्रम राबवित आहेत, शेतकऱ्यांना प्रशिक्षणाचा लाभ देत आहे याचीही तपासणी केली जाणार आहे. या सर्व निकषांच्या आधारे तपासणी करून त्यापैकी प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे राज्यभरातील बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित केली जाणार आहे.

## शेतमाल साठविण्यासाठी गोदामाची व्यवस्था

पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधाअंतर्गत रस्ते, सामायिक लिलावगृह, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, शेतमाल साठविण्यासाठी गोदाम, शीतगृह सुविधा, स्वच्छता व प्रतवारी सुविधा, शेतकऱ्यांसाठी निवास व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, बाजार समितीचे संगणकीकरण, बाजारभाव माहीत होण्यासाठी बाजार समितीने पुरविलेली सुविधा, बाजारातील खरेदीदारांचे प्रमाण व उपबाजार सुविधा आदी निकष आहेत.

पुढारी

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत बाजार समित्यांचे रँकिंग होणार जाहीर

## कृषी बाजार व्यवस्थेतील पहिलाच प्रयत्न : पणन संचालक सुनील पवार


**पुणे, पुढारी वृत्तसेवा :** बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाअंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी (रँकिंग) पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात येणार आहे. राज्यामध्ये प्रथमच अशा प्रकारे कार्यरत असलेल्या ३०७ बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यामध्ये स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाअंतर्गत पणन संचालनालय स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कार्यरत आहे. स्मार्ट प्रकल्पाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे' हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. राज्याच्या कृषी बाजार व्यवस्थेतील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. ३१ जुलै २०२२ अखेर राज्यभरातील बाजार समित्यांची निकषनिहाय माहिती व गुण याची माहिती प्राप्त होणार असून त्यानंतर लवकरच पणन संचालनालयाकडून बाजार समित्यांची २०२१-२२ या वर्षाची वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध केली जाणार आहे. या निकषांबाबत बाजार समित्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीची तालुका उप निबंधक किंवा सहायक निबंधक बाजार समितीस प्रत्यक्ष भेट देऊन व तपासणी करून गुण देणार आहेत. पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधा, आर्थिक कामकाज निकषात बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न, बाजार फी, वाढावा, शेतमाल आवक, वैधानिक कामकाजात समितीचे मागील ५ वर्षातील लेखापरीक्षण, सचिव नियुक्तीस मान्यता, संचालक मंडळाविरुद्ध झालेली बरखास्तीची कारवाई, खरेदीदारांच्या दप्तराची तपासणी, अडत्यांच्या वजनमापाची तपासणी आदी प्रमुख निकष आहेत.

### गुणांची क्रमवारी अशी निश्चित होणार

२०२१-२२ या वर्षाच्या कामगिरीनुसार क्रमवारी ठरविण्यासाठी ३५ निकष व २०० गुण ठरवण्यात आले आहेत. त्यामध्ये पायाभूत सुविधा व इतर सेवा-सुविधा अंतर्गत १४ निकष असून त्यासाठी एकूण ८० गुण, आर्थिक कामकाजाबाबत ७ निकष- ३५ गुण, वैधानिक कामकाजाबाबत ११ निकष- ५५ गुण तर योजना उपक्रमातील सहभाग व इतर विषयी ३ निकष असून त्यासाठी ३० गूण असे एकूण २०० गुणांवर आधारीत ही क्रमवारी असेल. म्हणजेच निकषांच्या आधारे प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे राज्यातील बाजार समित्यांची क्रमवारी निश्चित केली जाणार आहे.

Aurangabad Edition
Jul 23, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



### यंदा पहिल्यांदाच यशस्वी प्रयोग

# भारतीय आंबे समुद्रमार्गे अमेरिकेत

लोकसत्ता, प्रतिनिधी

**पुणे :** यंदा पहिल्यांदाच भारतीय आंबा समुद्रमार्गे अमेरिकेच्या बाजारपेठेत पोहोचला आहे. कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून समुद्रमार्गे जहाजातून ५ जून रोजी मुंबई येथून पाठविलेला आंबा अमेरिकेच्या बाजारपेठेत २ जुलैपासून विक्रीसाठी दाखल झाला आहे. आजवर केवळ हवाईमार्गे भारतीय आंबे अमेरिकेत जात होते. यंदा प्रथमच समुद्रमार्गे आंबे पाठिवले होते. २५ दिवसांचा प्रवास करून हे आंबे चांगल्या स्थितीत अमेरिकेत पोहोचले आहेत.

भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (अपेडा) आणि मे. सानप ॲग्रो ॲनिमल्स प्रा. लि. यांच्या संयुक्त प्रयत्नाने यंदा प्रथमच अमेरिकेस समुद्रमार्गे आंबा निर्यात करण्यात आला होता. ५ जून रोजी मुंबईतून पाठविलेला आंब्याचा कंटेनर ३० जून रोजी अमेरिकेतील नेवार्क बंदरात दाखल झाला. हा कंटेनर १ जुलै रोजी आयातदार मे. अनुसया फ्रेश प्रा.लि. यांनी ताब्यात घेऊन उघडल्यानंतर कंटेनरमधील आंबा सुस्थितीत पोहचल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पुढील हंगामापासून भारतीय आंबे समुद्रमार्गे अमेरिकेत जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसे झाल्यास आंबा उत्पादक शेतकरी, निर्यातदार आणि आयातदारांना फायदा होणार आहे.

भारतातून सन २०२२ मध्ये अमेरिकेस सुमारे ११०० टन आंबा निर्यात झाला आहे. अमेरिकेला होणारी आंबा निर्यात ही सध्या शंभर टक्के हवाईमार्गे होत आहे. त्यामुळे निर्यातदारांना प्रति किलो सुमारे ५५० रुपये विमानभाडे द्यावे लागते. त्यामुळे अमेरिकेतील ग्राहकांना भारतीय आंबा महाग पडत होता. परिणामी निर्यातीवर मर्यादा येत होत्या. त्यावर उपाय म्हणून यंदा समुद्रमार्गे आंबे निर्यातीचा प्रयोग करण्यात आला होता. त्याद्वारे एकूण १६.५६० किलो आंबे सुरक्षितपणे अमेरिकेत पोहोचले.

## समुद्रमार्गे वाहतूक फायदेशीर

आंबा समुद्रमार्गे निर्यात सुरू झाल्यास अमेरिकेत आंब्याच्या निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. आंबा कमी किमतीत ग्राहकापर्यंत पोहोचू शकतो. सध्या आंब्याचे विमान भाडे सुमारे ५५० रुपये प्रती किलो असून, तीन किलोच्या बॉक्सकरिता सुमारे २० ते २२ डॉलर विमान भाडे आकारले जाते. समुद्र मार्गे निर्यातीने वाहतूक खर्चात मोठ्या प्रमाणात कपात होऊन सदर खर्च १ डॉलर प्रती किलोपर्यंत खाली येऊन निर्यातीस मोठी चालना मिळू शकते. त्यामुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय आंबा किमतीच्या दृष्टीने इतर देशांच्या आंब्याशी स्पर्धा करू शकेल.

“ समुद्रमार्गे वाहतूक खर्चात मोठ्या प्रमाणात कपात होते. त्यामुळे अमेरिकेतील बाजारपेठेत इतर देशांच्या आंब्याच्या स्पर्धेत भारतीय आंबे टिकू शकतील. शिवाय अमेरिकेच्या बाजारात भारतीय आंबे जास्त दिवस राहतील. जहाजाद्वारे केशर आंबे पाठविले होते. हाच प्रयोग हापूसबाबतही करता येईल. समुद्रमार्गे निर्यात वाढविण्यासाठी आणि खर्चात कपात करण्यासाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरची मदत घेण्यात येईल. वाहतुकीचा कालावधी कमी करण्यासाठी संबंधित यंत्रणेत समन्वय साधला जात आहे. समुद्रमार्गे होणारी आंबा वाहतूक शेतकरी, निर्यातदार, आयातदार आणि अमेरिकेचा ग्राहक, अशा सर्वांच्या दृष्टीने फायद्याची होणार आहे.

\- सुनील पवार, कार्यकारी संचालक, पणन मंडळ

Loksatta 05/07/2022

पुण्य नगरी

पुण्य नगरी

# तारण वाटपात अमरावती विभाग राज्यात अग्रगण्य

**शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण कर्ज योजना ठरली वरदान**

**२ हजार ५३ शेतकऱ्यांना २६ कोटींचे कर्ज वाटप**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक हित साधणारी शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. अमरावती विभागात चालू हंगामात एकूण २ हजार ५३ शेतकऱ्यांनी शेतमाल तारणात ठेवला असून, सुमारे २६ कोटी रुपयाचे कर्जवाटप झाले आहे. अनेक वर्षांपासून शेतकरी योजनेचा लाभ घेत असून, ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.

अमरावती विभागात २२ कृषी उत्पन्न बाजार समिती शेतमाल तारण कर्ज योजना राबवत आहेत. सध्याची तारणाची परिस्थिती लक्षात घेतल्यास तारण वाटपात अमरावती विभाग राज्यात अग्रगण्य आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक तथा पणन संचालक सुनील पवार व सरव्यवस्थापक, दीपक शिंदे यांच्याकडून विभागनिहाय सातत्याने आढावा घेतला जातो. यापुढेही अमरावती विभागात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपला शेतमाल जवळच्या बाजार समितीत तारण ठेवून या योजनेचा निश्चितच मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती विभागाचे उपसरव्यवस्थापक मच्छिंद्र गवळे यांनी केले आहे. बाजारात हंगामाच्या काळात भाव पडल्यानंतर शेतकरी आपला शेतमाल बाजार समितीच्या किंवा वखार महामंडळाच्या गोदामात समित्यांच्या माध्यमातून तारणात ठेवतात. तारणात ठेवताना बाजारभाव किंवा किमान आधारभूत किंमतीचे प्रतिक्विंटल दरानुसार शेतकऱ्यांना बाजार समितीमार्फत एकूण शेतमाल किंमतीच्या ७५ टक्के तारण रक्कम अदा केली जाते. त्यानंतर शेतमालाची व कागदपत्राची पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत तपासणी होऊन पणन मंडळाकडून बाजार समित्यांना तारण कर्जाच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. सोयाबीन, तूर, हरभरा या शेतमालाच्या काढणीनंतर हंगामात शेतकरी आपला शेतमाल नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणतात. मोठ्या प्रमाणावर शेतमालाची आवक झाल्याने साहजिकच शेतमालाचे भाव खाली घसरतात.

कधी-कधी तर शासनाने ठरवून दिलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षाही दर खाली कोसळतात. अशावेळी आपला शेतमाल विक्रीची इच्छा नसूनही पैशाची निकड असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल कमी भावात विक्री करावा लागतो. त्यामध्ये व्यापाऱ्यांचा आर्थिक फायदा होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. ते टाळण्यासाठी शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. चालू हंगामात अमरावती विभागात एकूण २ हजार ५३ शेतकऱ्यांनी शेतमाल तारणात ठेवलेला आहे. याकरिता ८७ हजार ९६३ क्विंटल (सोयाबीन, तूर, हरभरा) शेतमाल तारणात ठेऊन २५.९४ कोटींचे कर्ज वाटप झाले आहे.

सकाळ

## कृषी पणन मंडळ : अमेरिकेत ११०० टन फळाची निर्यात; २५ दिवसांचा प्रवास

# केशर आंबा साता समुद्रापार

**पुणे, ता. ३ :** महाराष्ट्रातील केशर आंबा समुद्रमार्गे २५ दिवसांचा प्रवास करत अमेरिकेतील बाजारपेठेत पोचला आहे. आंब्यावर केलेल्या विविध प्रक्रियांमुळे इतक्या दिवसांनंतरही तो आपला दर्जा टिकवून होता. यंदा सुमारे ११०० टन आंबा अमेरिकेत पाठविला आहे, अशी माहिती कृषी पणन मंडळाकडून देण्यात आली.

राज्य कृषी पणन मंडळाच्या मुंबईतील सुविधा केंद्रावरून आंबा समुद्रामार्गे अमेरिकेत पाठविण्याची प्रक्रिया करण्यात आली होती. यापूर्वी विमानाने आंबा अमेरिकेत पाठविला जात होता. मात्र, त्याच्या वाहतूक खर्चात अधिक वाढ होत असल्याने निर्यातदारांना ते परवडेनासे झाले होते. त्यामुळे पणन मंडळाने निर्यातदारांची बैठक घेतली. कंटेनरमधून समुद्रामार्गे आंबा पाठविण्याचे नियोजन करण्यात आले.

समुद्रामार्गे ५ जूनला रोजी पाठविलेला आंबा अमेरिकेतील नेवार्क या न्यूजर्सी शहराजवळील बंदरात २९ जूनला अर्थात २५ दिवसांनी व्यवस्थित पोहोचला. तेथील आंबा आयातदार अनुसया फ्रेश प्रा. लि. यांनी तो ताब्यात घेतला. आंब्याची प्रत चांगली असल्याचे दिसून आले. त्यामुळे निर्यातदारांनी समाधान व्यक्त केले. अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय आंबा किमतीच्या दृष्टीने स्पर्धात्मक ठरून इतर देशांच्या आंब्याशी स्पर्धा करू शकतो. तसेच भारतीय आंब्याला अमेरिकेची बाजारपेठ जास्त कालावधीसाठी उपलब्ध होईल. यामुळे विमान वाहतुकीत आंब्याचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होइल. तसेच आंबा अधिक चांगल्या पद्धतीने आणि उत्तम स्थितीत उपलब्ध होईल. त्याशिवाय अमेरिकेसह अन्य देशांसाठी समुद्रामार्गे निर्यात करणे शक्य होणार आहे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

अमेरिकेत समुद्रामार्गे निर्यातीसाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचे डॉ. गौतम, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार तसेच अमेरिकेच्या निरीक्षक डॉ. कॅथरीन फिडलर यांनी मार्गदर्शन केले. सानप ॲग्रोॲनिमल्सचे हेमंत सानप, तसेच पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील, अभिमन्यू माने, सुशिल चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.



केशर आंबा

### अशी झाली प्रक्रिया

- आंब्याची व्यवस्थित तोडणी, त्याची प्रतवारी करण्यात आली
- सोडियम हायपोक्रोराइट्सची ५२ डिग्री सेल्सिअस तापमानामध्ये तीन मिनिटांची प्रक्रिया करून आंबा सुकविण्यात आला.
- भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरने विकसित केलेल्या रासायनिक पाण्यात तीन मिनिटांची प्रक्रिया करून पुन्हा आंबा सुकविण्यात आला.
- आंबा तीन किलोच्या बॉक्समध्ये भरून त्याची विकिरण सुविधा केंद्रात एनपीपीओच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली.
- त्यांच्या मान्यतेनंतर आंब्यावर विकिकरण प्रक्रिया करण्यात आली.
- त्यांनतर सुमारे साडेपाच हजार पेट्यांमध्ये १६ हजार ५६० किलो आंबा समुद्रमार्गे अमेरिकेत पाठविला



**अमेरिका : समुद्रमार्गे अमेरिकेतील बाजारपेठेत दाखल झालेला केशर आंब तेथील व्यापाऱ्यांनी ताब्यात घेतला.**

**समुद्रमार्गे निर्यात सुरू झाल्याने अमेरिकेत आंब्याच्या निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. तसेच आंबा कमी किमतीत ग्राहकापर्यंत पोहोचू शकतो. सध्या आंब्याची १०० टक्के वाहतू विमानाने केली जाते. त्यामुळे सुमारे ५५० रुपये प्रतिकिलो विमानभाडे असून, तीन किलोच्या बॉक्ससाठी सुमारे २० ते २२ डॉलर विमान भाडे आकारले जाते. समुद्रमार्गे निर्यातीने हा खर्च एका किलोसाठी एक डॉलरपर्यंत कमी होऊ शकतो. त्यामुळे आंबा निर्यातीला चालना मिळू शकते.**

– **सुनील पवार,** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

Pune, Main
04/07/2022 Page No. 2

# समुद्रमार्गे केशर आंब्यांची अमेरिकेला यशस्वी निर्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईतून अमेरिकेत केशर आंब्यांची समुद्रमार्गे यशस्वी निर्यात झाली आहे.

५ जून रोजी मुंबईहून विविध निर्यातीसाठीच्या आवश्यक प्रक्रिया करून पाठविलेला आंबा अमेरिकेच्या बाजारपेठेत २९ जूनला म्हणजे २५ दिवसांनी सुस्थितीतं पोहोचला. त्यामुळे अधिक विमान भाडे देण्याऐवजी आता स्वस्त जलवाहतुकीद्वारे आंबा निर्यातीच्या नव्या पर्यायांमुळे देशातून अमेरिकेसह अन्य देशांना आंबा निर्यातीचा नवा पर्याय खुला झाला आहे.

अमेरिकेस समुद्रमार्गे आंबा निर्यातीसाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचे (बीएआरसी) डॉ. गौतम, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक व राज्याचे पणन संचालक सुनील पवार, तसेच अमेरिकेच्या निरीक्षक डॉ. कॅथरीन फिडलर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

> मुंबईहून विमान वाहतुकीचे भाडे हे आंब्यांच्या तीन किलोच्या बॉक्सला १,७५० रुपये येते. जलवाहतुकीद्वारे तीन किलोच्या बॉक्सला हेच भाडे आता २५० रुपयांपर्यंत खाली येणार आहे. वाहतूक खर्चातील बचतीमुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय आंबा किमतीच्या दृष्टीने स्पर्धात्मक ठरून अन्य देशांच्या आंब्यांशी स्पर्धा करू शकतो. उत्तम दर्जा आणि वाजवी दरामुळे आंबा विक्री अधिक होऊन निर्यातीला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. तसेच अमेरिकेबरोबरच इतर देशांनाही समुद्रमार्गे आंबा निर्यात शक्य होणार आहे.
>
> - **सुनील पवार**, कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ,पुणे

**अधिक विमान भाड्याऐवजी स्वस्त जलवाहतुकीचा नवा पर्याय**

मुंबईतून एकूण ५ हजार ५२० बॉक्सेसमधून १६ हजार ५६० किलो केशर आंब्यांवर निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या योग्य त्या प्रक्रिया केल्यानंतरच कंटेनरद्वारे ३ जून रोजी जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट न्हावाशेवा बंदराकडे रवाना करण्यात आला. तेथून ५ जून रोजी आंब्यांचा कंटेनर अमेरिकेकडे रवाना झाला होता. हा कंटेनर अमेरिकेत नेवार्क या न्यूजर्सी शहराजवळील बंदरात २९ जून २०२२ रोजी पोहोचला. आंबा निर्यातदार असलेल्या खासगी कंपनीने पाठविलेला आंबा तेथील आयातदार कंपनीच्या प्रतिनिधींनी ताब्यात घेतला. कंटनेरमधील आंबा सुस्थितीत पोहोचल्याने समाधान व्यक्त होत आहे. या कामी बीएआरसीचे अधिकारी, केंद्र सरकारचे अधिकारी, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील, अभिमन्यू माने, सुशील चव्हाण आणि खासगी आंबा निर्यातदारांनी विशेष परिश्रम घेतले.



अमेरिकेत पोहोचलेल्या आंब्यांची पाहणी करताना आयातदार, अधिकारीवर्ग.

दरम्यान, भारतातून चालूवर्षी २०२२ मध्ये अमेरिकेला अकराशे टन आंब्यांची शंभर टक्के हवाई वाहतुकीद्वारेच निर्यात झाली. त्यासाठी प्रतिकिलोस ५५० रुपये विमानभाडे द्यावे लागले आहे. त्या पार्श्वभूमीवर स्वस्त जलवाहतुकीने नवी संधी अधिक आंबा निर्यातीस मिळणार असल्याचे पणन मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले.

Pudhari 04/07/2022

मटा CITIZEN REPORTER
तुम्हाला भेडसावणाऱ्या समस्या, 'दिसणाऱ्या' बातम्या मांडू शकता 'महाराष्ट्र टाइम्स'च्या या व्यासपीठावर
MT Citizen Reporter हे ॲप गुगल प्ले स्टोअर, ॲपल ॲप स्टोअर तसेच विंडोज फोन स्टोअरवरून डाऊनलोड करता येईल.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । सोमवार, ४ जुलै २०२२

महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club
आता नव्या रुपात ऑनलाईन सदस्यत्वासाठी खास पॅकेज
एका महिन्यासाठी - ₹
तीन महिन्यांसाठी - ₹
वर्षभरासाठी - ₹
आजच लॉग इन करा www.mtcultureclub.com वर



# आंब्याची प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकावारी



म. टा. प्रतिनिधी, पुणे

भारतीय आंबा यंदा समुद्रामार्गे अमेरिकेतील बाजारपेठेत यशस्वीरीत्या पाठविण्यात आला. जलवाहतुकीद्वारे आंबा पाठविण्याच्या खर्चात बचत होत असल्याने निर्यातीचा हा नवीन पर्याय आता समोर आला आहे. यंदा अमेरिकेत ११०० टन आंब्याची पाठवणी करण्यात आली.

**कृषी पणन मंडळाची मदत**

- राज्य कृषी पणन मंडळाच्या मुंबईतील सुविधा केंद्रावरून आंबा अमेरिकेला निर्यात करण्यात आला.
- यापूर्वी आंबा अमेरिकेत हवाई वाहतुकीद्वारे पाठविला जात होता. मात्र, खर्चात वाढ होत असल्याने निर्यातदारांना ते परवडेनासे झाले. त्यामुळे समुद्रामार्गे आंबा निर्यात करण्याचा प्रस्ताव पणन मंडळाकडे विचाराधीन होता. त्यानुसार, पणन मंडळाने निर्यातदारांची बैठक घेतली.
- कंटेनरमधून समुद्रामार्गे आंबा पाठविण्याचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी आंब्याची तोडणी करून पणन मंडळाच्या वाशी (मुंबई) येथील भाजीपाला प्रक्रिया केंद्रात प्रतवारी करण्यात आली. सोडियम हायपोक्रोराइट्समध्ये ५२ अंश सेल्सियस तापमानावर प्रक्रिया करून आंबा सुकविण्यात आला.
- 'भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर'ने विकसित केलेल्या रासायनिक द्रव्यात प्रक्रिया करून आंबा पुन्हा सुकविण्यात आला. नंतर आंबा तीन किलोच्या पेटीत भरण्यात आला. त्यानंतर अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाच्या निरीक्षकांनी आणि 'एनपीपीओ'च्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली.
- सुमारे साडेपाच हजार पेट्यांद्वारे १६ हजार ५६० किलोग्रॅम आंबा कंटेनरद्वारे पाच जूनला अमेरिकेला रवाना करण्यात आला. हा कंटेनर अमेरिकेतील नेवार्क शहराजवळील बंदरात २९ जून रोजी अर्थात २५ दिवसांनी पोहोचला.

**निर्यातीला यांचाही हातभार...**

अमेरिकेस समुद्रमार्गे आंबा निर्यातीसाठी 'भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर'चे डॉ. गौतम, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, अमेरिकेच्या फूड इन्स्पेक्टर डॉ. कॅथरिन फिडलर यांनी मार्गदर्शन केले. सानप ॲग्रो ॲनिमल्सचे हेमंत सानप, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील, अभिमन्यू माने, सुशील चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.



संग्रहित छायाचित्र

आंब्यावर प्रक्रिया करताना.

**जलमार्गे स्वस्त निर्यात?**

- समुद्रामार्गे वाहतुकीला प्रोत्साहन मिळाल्यास अमेरिकेत आंब्याची निर्यात वाढू शकते. आंबा कमी किमतीत ग्राहकांपर्यंत पोहोचवला जाऊ शकतो.
- सध्या आंब्याची निर्यात पूर्णपणे हवाईमार्गे केली जाते. निर्यातीसाठी प्रति किलो ५५० रुपयांचा खर्च येतो. तीन किलोच्या पेटीसाठी सुमारे २० ते २२ डॉलर विमानभाडे आकारले जाते. समुद्रमार्गे निर्यात केल्यास एका किलोसाठी वाहतूक खर्च एक डॉलरपर्यंत कमी होऊ शकतो.
- निर्यातीसाठी कमी खर्च आल्यास अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय आंब्याचे भाव नियंत्रणात राहू शकतात. त्यामुळे अन्य देशांच्या आंब्याशी स्पर्धा होऊ शकते.

लोकमत

१६ टन आंब्याची निर्यात

# 'फळांचा राजा' समुद्रमार्गे अमेरिकेत



समुद्रमार्गे पाठविण्यात आलेले आंबे ३० जूनला अमेरिकेतीतील नेवार्क बंदरात पोहोचले. २५ दिवसांच्या प्रवासानंतरही आंबे हे सुस्थितीत असल्याचे सांगण्यात आले.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** भारतीय आंबा समुद्रमार्गे अमेरिकेत पाठविण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे. ३ जूनला १६ हजार ५६० किलो आंबा जेएनपीटीवरून निर्यात केला होता. २५ दिवसांच्या प्रवासानंतर आंबा ३० जूनला नेवार्क बंदरात पोहोचला असून तो सुस्थितीमध्ये असल्याचे निदर्शनास आले आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे भविष्यात निर्यात वाढण्यास मदत होणार आहे.

भारतामधून अमेरिकेला हवाई मार्गाने आंबा निर्यात केला जातो. २०२२ च्या हंगामात ११०० टन आंबा हवाईमार्गे पाठविण्यात आला. हवाई मार्गाने आंबा निर्यात करताना वाहतुकीवर खूप खर्च होतो.

हा खर्च कमी करण्यासाठी समुद्रामार्गे आंबा निर्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कृषी पणन मंडळ, अपेडा, भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर व सानप अॅग्रो यांच्या प्रयत्नाने ३ जूनला पणन मंडळाच्या नवी मुंबईमधील शितगृहातून ५५२० बॉक्समधून १६,५६० किलो आंबा जेएनपीटीवरून निर्यात केला होता. ३० जूनला हा आंबा नेवार्क बंदरात दाखल झाला. आयातदार अनुसया फ्रेश यांनी १ जुलैला तो ताब्यात घेऊन कंटेनर उघडला असता सर्व आंबे सुस्थितीमध्ये असल्याचे निदर्शनास आले.

## निर्यात खर्चात बचत

हवाई मार्गाने आंबा निर्यात करण्यासाठी प्रतिकिलोला २० ते २२ डॉलर खर्च येतो. समुद्रमार्गाने निर्यात करण्यासाठी प्रतिकिलो १ रुपया खर्च येत आहे. निर्यातीसाठी होणाऱ्या खर्चात बचत होणार असल्यामुळे यापुढे अमेरिकेला होणाऱ्या आंबा निर्यातीमध्ये वाढ होणार आहे.

समुद्रमार्गाने आंबा अमेरिकेस पाठविण्यासाठी २५ दिवसांचा कालावधी लागला. या प्रवासात आंबा खराब होऊ नये यासाठी आंब्यावर हायप्रो क्रोराईटची ५२ डिग्री तापमानात तीन मिनिटांची प्रक्रिया करून बीएआरसीच्या तज्ज्ञ पथकाच्या देखरेखीखाली आंब्यावर प्रक्रिया करून तो पाठविण्यात आला होता.

समुद्रमार्गे आंबा पाठविण्यामध्ये पणन संचालक सुनील पवार, बीएआरसीचे डॉ. गौतम, अमेरिकेच्या निरीक्षक कॅथरीन फिडरल, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील, अभीमन्यू माने, सुशील चव्हाण, सानप अॅग्रोचे हेमंत सानप व इतरांनी परिश्रम घेतले.

# भारतातून समुद्रमार्गे अमेरिकेत आंब्याची निर्यात यशस्वी

Agrowon
04/07/2022

## अमेरिकेच्या बाजारपेठेत २५ दिवसांनी आंबा दाखल; खर्चात बचत

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : आंब्याचा अमेरिकेतील निर्यात खर्च कमी व्हावा, या उद्देशाने राज्य कृषी पणन मंडळ, भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर यांनी केलेल्या संशोधन आणि प्रयोगांना यश आले आहे. २५ दिवसांनी समुद्रमार्गे आंबा अमेरिकेत सुस्थितीत दाखल झाला आहे. यामुळे आता भविष्यात समद्रामार्गे कमी खर्चात निर्यातीला चालना मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा विमानाने निर्यातीचा खर्च वाचणार आहे.

भारतातून अमेरिकेला आंब्याची १०० टक्के निर्यात ही हवाईमार्गेच होत होती. मात्र यामध्ये मोठा खर्च होत होता. कोरोनाकाळ आणि युक्रेनयुद्धामुळे विमानाच्या भाडेदरात



देखील मोठी वाढ झाली होती. यामुळे निर्यातीचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला होता. हा खर्च प्रति किलो सुमारे २० ते २२ डॉलर एवढा होता. तो आता केवळ १ डॉलर प्रति किलो झाला आहे. निर्यात खर्चात मोठी बचत झाल्यामुळे जास्तीत जास्त शेतकरी

**“ आंबा टिकवण क्षमता वाढीसाठी भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटरद्वारे प्रक्रिया तंत्रज्ञान विकसित करण्यात आले. या प्रक्रियेच्या चाचण्या घेण्यात आल्या. चाचण्या यशस्वी झाल्यानंतर 'सानप ॲग्रो ॲनिमल्स' या निर्यातदारांद्वारे निर्यातीचा प्रयोग केला. या प्रयोगात ५ हजार ५२० बॉक्समधून १६ हजार ५६० किलो आंबा निर्यात करण्यात यश आले.**

**- सुनील पवार,**
कार्यकारी संचालक, पणन मंडळ

समुद्रमार्गे आंबा निर्यात करू शकणार आहेत.

**पान ४ वर**

# भारतातून समुद्रामार्गे अमेरिकेत आंब्याची निर्यात यशस्वी

» पान १ वरून

पणन संचालक आणि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार म्हणाले,'' आंबा काढणीपासून ते प्रत्यक्ष समुद्रमार्गे अमेरिकेतील बाजारपेठेत दाखल होण्याचा कालावधी हा २५ ते ३० दिवसांचा होता. या कालावधीमध्ये आंबा खराब होण्याची मोठी भीती होती. ती आता दूर झाली आहे.''

या प्रयोगासाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचे डॉ. गौतम, अमेरिकेच्या इन्स्पेक्टर डॉ. कॅथरिन फिडलर, सानप ॲग्रो ॲनिमल्सचे हेमंत सानप, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक भास्कर पाटील, अभिमन्यू माने, सुशिल चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

Agrowon 04/07/2022

लोकमत

शेतमाल तारण योजनेचा शेतकऱ्यांनी घेतला फायदा

# चाळीसगाव बाजार समितीत शेतकऱ्यांना कर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**चाळीसगाव** : महाराष्ट्र कृषी पणन मंडळ पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतमाल तारण योजनेंतर्गत चाळीसगाव बाजार समितीत दरवर्षी शेतमाल तारण योजना राबविण्यात येते. या योजनेत शेतमालावर बाजार समितीने त्यांना एकूण १ लाख ६३ हजार रुपयांचे कर्ज शुक्रवारी वितरण केले.

२०२२-२३ या वर्षात इंदुबाई अण्णा बोबडे, विमलबाई हिम्मत एरंडे, हिम्मत विठ्ठल एरंडे, रवींद्र हिम्मत पानकर (सर्व रा. खरजई) यांनी वेअर हाऊस गोडाऊनला मका हा शेतीमाल तारण ठेवला आहे.



**चाळीसगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना शासन योजनेंतर्गत कर्ज वाटप धनादेश देताना दिनेश पाटील, सोबत रमेश सोनगिरे, सुभाष खंडाळे, सतीश पाटील आदी.**

या शेतकऱ्यांना तारण कर्जाचे वाटप बाजार समितीचे मुख्य प्रशासक दिनेश पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी प्रशासक रमेश सोनगिरे, ॲड. सुभाष खंडाळे, सचिव सतीश पाटील, डी. एस. गायके व शेतकरी उपस्थित होते.

## काय आहे शेतमाल तारण योजना

- शेतमाल तारण योजनेंतर्गत गोडाऊनला तारण ठेवलेल्या शेतमालाचे गोडाऊन भाडे हे बाजार समिती अदा करीत असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतमाल तारण योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीच्या वतीने पाटील यांनी केले.

# चाळीसगाव कृउबात शेतमाल तारण योजनेतंर्गत शेतकऱ्यांना कर्ज वाटप



देशोन्नती वृत्तसंकलन...

**चाळीसगाव** ▪ महाराष्ट्र कृषी पणन मंडळ पुणे यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतमाल तारण योजने अंतर्गत चाळीसगाव बाजार समितीत दरवर्षी शेतमाल तारण योजना राबविण्यात येते.

सन २०२२-२३ या वर्षात इंदुबाई अण्णा बोबडे, विमलबाई हिंमत एरंडे, हिंमत विठ्ठल एरंडे, रवींद्र हिंमत पानकर सर्व रा. खरजई यांनी वेअर हाऊस गोडावून ला मका हा शेतीमाल तारण ठेवला आहे. या शेतमालावर बाजार समितीने त्यांना एकूण रुपये १६३००० रुपये कर्ज वितरण केले. त्यावेळी शेतकऱ्यांना तारण कर्जाचे धनादेश देताना बाजार समितीचे मुख्य प्रशासक दिनेश पाटील, प्रशासक रमेश सोनगिरे, ॲड सुभाष खंडाळे, सचिव सतिष पाटील, डी. एस. गायके व शेतकरी उपस्थित होते. शेतमाल तारण योजने अंतर्गत गोडाऊनला तारण ठेवलेल्या शेतमालाचे गोडाऊन भाडे हे बाजार समिती अदा करीत असते, त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतमाल तारण योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे प्र.सचिव यांनी केलेले आहे.

देशोन्नती दि. 02 जुलै 2022